# प्रकरण – 2 (मॅन्युअल-1)

## संघटनेची वैशिष्ट्ये, कामे आणि कर्तव्ये

### 2.1 लोक - प्राधिकरणाचे उद्दिष्टे –

बृहन्मुंबई महानगरपालिका निम स्वायत्त संस्था आहे. खाजगी निविदाधारकांच्या सहभागामधून महसूल वाढविण्याची शक्यता शोधून काढण्यासाठी खाजगीकरण प्रारंभिक कक्ष स्थापन करण्यात आला होता. सदर कक्ष निविदाधारकांच्या सहभागातून विल्हेवाटासाठी (निकालात काढण्यासाठी) मालमत्ता ठरविण्यासाठी, कायदेशीर आणि विकासपूर्ण ठराव तपासण्यासाठी, विकास अधिनियम नियमावली 33(7), 33(8), 33(9), अन्वये भूखंडाचे प्रस्ताव त्वरेने काढण्यासाठी पारदर्शकता आणि फायदा एकत्रित होऊन महसूल वाढविण्यासाठी धोरण ठरविण्यासाठी. परंतु आता हया विभागामार्फत विकास अधिनियम नियमावली ३३(७), ३३(९) आणि ३३(१०) अन्वये महानगरपालिकेच्या मालमत्तेच्या पुनर्विकासाचे प्रकल्प हाताळले जातात. तसेच इतर प्रकल्प संबधित खात्यामार्फत केले जातात.

### 2.2 लोक- प्राधिकरणाचे ध्येय/मंडळाचे व्हिजन (दृष्टी)

भविष्यकाळात संबंधित खात्यांना विकासाची/पुनर्विकासाची कामे घेऊन संघटित करण्यासाठी.

### 2.3 लोक- प्राधिकरणाची थोडक्यात इतिहास आणि त्यांच्या रचनेचा संदर्भ

हे खाते सन् 2000 मध्ये अशावेळी स्थापन झाले, जेव्हां शतकापेक्षा जास्त वर्षांच्या इतिहासामध्ये महानगरपालिकेत तुटीचा अर्थसंकल्प चालू होता (लागू होता). त्यावेळी खाजगी निविदाधारकांच्या सहभागातून महसूल निर्माण करावयाच्या शक्यता शोधून काढण्याचे ठरविण्यात आले होते. ``खाजगीकरण प्रारंभिक कक्ष'' म्हणून ओळखला जाणारा कक्ष अशाप्रकारे काही निवडक अभियंते आणि प्रशासकीय कर्मचारीवृंदांच्या मदतीने स्थापन करण्यात आला होता.

## 2.4 लोक- प्राधिकरणाची कामे_

सार्वजनिक खाजगी सहभाग प्रोत्साहन कक्षाची कामे खालीलप्रमाणे होती –

1) निकालात (मार्गी लावावयाच्या) काढावयाच्या मालमत्ता ठरविणे.
2) कायदेशीर आणि विकासपूर्ण ठराव तपासण्यासाठी.
3) पारदर्शकता आणि नफा एकत्रित वाढविण्यासाठी धोरण ठरविण्यासाठी.
4) विविध परवानग्या आणि निपटारा सुकर करण्यासाठी आणि मिळविण्यासाठी समन्वय साधणारा कक्ष म्हणून काम करणे.
5) जशी बाब (स्थिती) असेल त्याप्रमाणे महसूल वाढविण्यासाठी आणि खर्च वाचविण्यासाठी, निविदाधारकांच्या सहभागामधून विकास अधिनियम नियमावली 33(7) आणि 33(9) अन्वये मनोरंजन आणि खेळाची मैदाने, बाजार, साफसफाई कर्मचारी वसाहतींच्या भूखंडांचे प्रस्ताव त्वरेने मांडण्यासाठी.
6) निविदाधारकांतर्फे `बांधा, वापरा आणि हस्तांतरण करा' ह्या तत्वावर पायाभूत प्रकल्पांचा विकास ह्या योजना ठरविणे.

## 2.5 लोक- प्राधिकरणाची मुख्य कामे –

खात्याची मुख्य कामे खालीलप्रमाणे –

1) महानगरपालिकेच्या मालमत्तेच्या पुनर्विकासाची शक्यता शोधून काढून महसूल वाढविण्याबाबत.
2) बांधा,वापरा आणि हस्तांतरण करा' या धर्तीवर प्रस्तावांचा विचार करणे.

## 2.6 लोक- प्राधिकरणाव्दारे देण्यात येणा-या सेवांची यादी आणि थोडक्यात माहिती-_

1) महापालिका भाडेकरु मालमत्तांचा पुनर्विकास.

2.7 **लोक- प्राधिकरणाच्या वेगवेगळया स्तरांवर (शासन, निर्देशालय, क्षेत्र, जिल्हा, ब्लॉक, इ.) रचनात्मक आकृती (जिथे लागू आहे )**



**2.8 लोक- प्राधिकरणाची कार्यदक्षता वाढविण्याच्या हेतूने जन सहयोगाची अपेक्षा-**

खाजगी पक्षकारांमार्फत निरनिराळी कामे ह्या विभागाकडून केली जातात. त्याबाबतीत नागरिक त्यांची मते कळविण्यासाठी ह्या खात्याशी संपर्क साधू शकतात.

**2.9 जन सहयोग ठरविण्यासाठी पध्दती/ व्यवस्था** –

खालील ठिकाणी असलेल्या ह्या कक्षाशी नागरिक संपर्क साधू शकतात –

उप प्रमुख अभियंता (सार्वजनिक खाजगी सहभाग प्रोत्साहन)
महानगरपालिका मुख्यालय,
इर्जिनिअरींग हब बिल्डींग , 3 रा मजला,
डॉ इ. मोझेस रोड, वरळी नाका, वरळी
मुंबई – 400 018
दूरध्वनी क्र. 24912475

**2.10 जनसेवेच्या तक्रारींचे निराकरण करण्याची व्यवस्था** –

लोकांना जर काही माहिती हवी असेल, जर कांही तक्रार असेल तर ते खालील ठिकाणी असलेल्या ह्या कक्षाशी संपर्क साधू शकतात –

उप प्रमुख अभियंता (सार्वजनिक खाजगी सहभाग प्रोत्साहन)
महानगरपालिका मुख्यालय,
इर्जिनिअरींग हब बिल्डींग, 3 रा मजला,
डॉ इ. मोझेस रोड, वरळी नाका, वरळी
मुंबई – 400 018
दूरध्वनी क्र. 24912475